दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

• वर्ष १७ वे • अंक २४० • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.३० नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## आता प्रत्येक तालुक्यात हेलिपॅड होणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील विमानतळांच्या धावपट्ट्यांचे विस्तारीकरण करतानाच प्रत्येक तालुक्यात हेलिपॅड तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी दिले. याचा फायदा वैद्यकीय साहाय्यासाठी होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले.

गोसेखुर्द, कोयना, कोकण भागात पर्यटनाच्या दृष्टीने 'सी–प्लेन' सुरू करण्याबाबत आढावा घेण्याचे निर्देशही मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीची ८१वी संचालक मंडळाची बैठक मंत्रालयात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी पार पडली. वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर आणि संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. राज्यात एकूण १५ विमानतळे असून, २८ धावपट्ट्या आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद येथील विमानतळांचा पूर्णक्षमतेने वापर होत असून, शिर्डी विमानतळावर नाइट लँडिंगची सुविधा निर्माण करण्याचा प्रस्ताव नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडे पाठविण्यात आला आहे.

# खारघरमधील दारूबंदीच्या सीमा वाढवा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पूर्वीच्या खारघर ग्रामपंचायतीच्या हद्दीच्या बाहेरही खारघर शहर झपाट्याने वाढले आहे. या गोष्टीचा विचार करून खारघरकरांची मते जाणून दारूबंदीच्या सीमा वाढवण्यात याव्यात. तसेच पूर्वाश्रमीच्या खारघर ग्रामपंचायतीमधील क्षेत्रामधील किरकोळ व घाऊक मद्यविक्री बंदीच्या धोरणाबाबत सोमवारी झालेल्या प्रशासकिय महासभेमध्ये पनवेल महानगरपालिका प्रशासनाने दारूबंदीसाठी ठराव घेऊन ज्या सीमा कायम केलेल्या आहेत त्या ठरावाची मागणी मा. विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली आहे.**

'नो लीकर झोन' म्हणून ओळख असणाऱ्या खारघर शहरात निरसुख पॅलेस नामक एका नव्या बार अँड रेस्टॉरंटला उत्पादन शुल्क विभागाने दारूविक्रीची परवानगी दिली आहे. या निरसूख पॅलेस बारला विरोध कायम असून राजकीय पक्षांसह विविध स्तरातून विरोध केला जात आहे. या बारविरोधात रविवारी (दि.२७ नोव्हेंबर) सर्वपक्षीय आणि सामाजिक संघटनांच्या माध्यमातून संघर्ष समितीच्या नियोजनाखाली एकदिवसीय खारघर बंद



पाळण्यात आला. खारघरमधील या बारला विविध स्तरातून होत असलेला विरोध पाहता जनभावनेचा आदर करून दुसऱ्याच दिवशी (सोमवार दि.२८ नोव्हेंबर) पनवेल महानगरपालिका प्रशासनाने खारघर ग्रामपंचायतीचा दारूबंदीचा ठराव कायम करून पुढे त्या संदर्भात कार्यवाही करण्यासाठी निर्णय घेतला आहे.

२७ जुलै २०१७ रोजी झालेल्या पन–वेल महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये पनवेल महानगरपालिका हद्दीमधील पूर्वीच्या खारघर ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये दारूबंदी कायम करण्यात आली होती. परंतु ग्रामपंचायतीचे रूपांतर महापालिकेत झाल्यानंतर सदर ठिकाणी दारूविक्री परवाना देण्यास सुरूवात झाली आहे. त्यामुळे खारघर परिसरातील जनतेचे मत लक्षात घेऊन जनहिताचा कौल मान्य करत खारघर



ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आलेली दारूबंदी पनवेल महानगरपालिकेने देखील कायम ठेवावी, या धर्तीवर मा. विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यानुसार १८ डिसेंबर २०१७ रोजीच्या आयत्या वेळेस विषय क्रमांक १ मध्ये हा विषय चर्चेत आला आणि प्रशासनाने त्यावेळी दारूबंदी संदर्भात ठराव केला. त्यासंदर्भात पुढील कार्यवाही न झाल्यामुळे खारघर परिसरात निरसुख पॅलेस बार यांना राज्य उत्पादन शुल्का कडून दारू विक्री परवाना देण्यात आला.

या मागणीबाबत पनवेल महापालिकेने सकारात्मक निर्णय घेऊन पूर्वाश्रमीच्या खारघर ग्रामपंचायतीमधील क्षेत्रामधील किरकोळ व घाऊक मद्यविक्री बंदीच्या धोरणाबाबत प्रशासकिय महासभेमध्ये मंजूरी देण्यात आली असून प्रितम म्हात्रे यांच्या मागणीला व पाठपुराव्याला यश आले आहे.

**दि.१८ डिसेंबर २०१७ रोजी बोलविण्यात आलेल्या महासभेत पनवेल महानगरपालिका हद्दीमधील पूर्वीच्या खारघर ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये दारूबंदी कायम करण्यात आली होती. परंतु ग्रामपंचायतीचे रूपांतर महानगरपालिकेत झाल्यानंतर सदर ठिकाणी दारूविक्री परवाना देण्यास सुरुवात झाली आहे. तरी खारघर परिसर हा पूर्वीप्रमाणेच 'नो लिकर झोन' करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेमध्ये पारित करण्यात यावा अशी मागणी तत्कालीन विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली होती आणि तत्कालीन सभागृहनेते परेश ठाकूर यांनी पनवेल महापालिका अंतर्गत येणाऱ्या शाळा व महाविद्यालयाच्या १०० मीटर भोवतालच्या शाळांमध्ये हॉटेलचा सर्व्हे करून तेथील दारूविक्री परवाने देखील रद्द करण्यात यावे अशी लक्षवेधी मांडली.**

मी २०१७ रोजी खारघर क्षेत्रात दारूबंदी करण्यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती, जर त्याच वेळेस हा निर्णय झाला असता तर आज नागरिकांना खारघर बंद साठी रस्त्यावर येण्याची गरज नसती. याबाबत उशिरा का होईना परंतु पनवेल महानगरपालिका प्रशासनाकडून योग्य तो निर्णय घेण्यात आला याबद्दल मी समाधानी आहे. परंतु महाराष्ट्र राज्य सरकार आणि राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे जोपर्यंत अधिकृत खारघर नो लीकर झोन म्हणून नोंद होत नाही तोपर्यंत मी आमच्या महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा सुरूच ठेवणार!

**प्रितम जनार्दन म्हात्रे, (विरोधी पक्ष नेता पनवेल महानगरपालिका)**

## मुंबई महापालिका निवडणुका स्वबळावरच लढणार : राज ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बालेकिल्ला हा काही नेहमीच अभेद्य राहत नाही, कधी ना कधी तो भेदला जातोच, अनेक ठिकाणी प्रस्थापितांविरोधात काही पक्षांना यश मिळालेच आहे, आमचाही लढा त्यासाठीच राहील, असे सांगतानाच मुंबई महापालिका निवडणूक स्वतंत्रपणे लढणार असल्याची माहिती मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कोल्हापुरात पत्रकार बैठकीत दिली.



विविध निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोकण दौऱ्यावर जाताना कोल्हापुरात त्यांनी पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. यावेळी त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, पश्चिम महाराष्ट्र हा काँग्रेसचा, मुंबई शिवसेनेचा बालेकिल्ला समजला जातो. पण कधी ना कधी येथेही विरोधक निवडून आलेच ना. म्हणून बालेकिल्ल्याला धडक मारण्यासाठी आपण आता पश्चिम महाराष्ट्र दौरा करणार आहे. मुंबई महापालिकेत कुणाशीही युती न करता स्वतंत्र लढणार असल्याचे राज ठाकरे यांनी जाहीर केले.

मी कधी भाजपसाठी तर कधी महाविकास आघाडीसाठी काम करतो, असा आपल्यावर आरोप होतो. पण तसे काहीच नाही. मी जे काम करतो, ते केवळ पक्षासाठी, माझ्यासाठी आणि महाराष्ट्रासाठी असा खुलासा त्यांनी केला.

मनसेचा विस्तार झाला नाही असा जो आरोप केला जातो, त्यांनी भाजपचा जन्म कधीचा, शिवसेना किती वर्षाने मुंबई महापालिकेत सत्तेवर आली हा इतिहास तपासावा, असा टोला मारला. प्रत्येक गोष्टीला वेळ लागतो, वेळ यावी लागते. मनसेचेही दिवस नक्की येतील, असा विश्वास राज ठाकरे यांनी व्यक केला.

महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर जोरदार टीका करताना पदावर बसलेल्या काहींना पोच नसते त्याचा हा पुरावा असल्याचे ते म्हणाले. यांना कुणी तरी स्क्रिप्ट लिहून देते का अशी विचारणा करतानाच केवळ मुळ प्रश्नापासून जनतेचे लक्ष विचलीत करण्यासाठीच हे होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत पथविक्रत्यांना कर्ज पुरवठा करण्याबाबत महापालिकेडून बँकांना सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रधानमंत्री स्वनिधी योजने अंतर्गत महापालिकेच्यावतीने रूपये दहा हजाराचे पथविक्रेत्यांना भांडवल सहाय्य म्हणून खेळते भांडवल कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे.केंद्र शासनाचा व महाराष्ट्र राज्य् शासनाचा हा प्राथ्यमक्रमाचा विषय असून संबधित बँकानी प्रधानमंत्री स्वनिधी योजने अंतर्गत अर्ज केलेल्या लाभार्थ्यांना सहकार्य करून तात्काळ त्यांची कर्जे मंजूर करावे अशा सूचना आयुक्त गणेश देशमुख यांनी उपस्थितांना दिल्या.



महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (डेएनयुलएम) विभागाच्यावतीने सर्व बँक प्रतिनिधींची बैठक आज(२९ नोव्हेंबर) मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपायुक्त कैलास गावडे, दीनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाचे व्यवस्थापक विनया म्हात्रे, नवनाथ थोरात, विविध बँकाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उपायुक्त कैलास गावडे यांनी बँकांकडे पेडिंग असलेल्या केसेसविषयी माहिती देऊन, बँकांनी महापलिकेला सहकार्य करण्याविषयी सूचित केले. ज्या पथविक्रत्यांचे बँकेत खाते नाही त्यांना झिरो बॅलन्सवरती खाते उघडण्यास मदत करावी. संबधित लाभार्थ्यांना सतत बँकेमध्ये हेलपाटे मारण्यास लागू नये याची काळजी घ्यावी अशा सूचना त्यांनी उपस्थितांना दिल्या.

नगरपथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. नगरवासीयांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तु व सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात ते महत्वपूर्ण भूमिका बजावतात. कोविड– १९च्या टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरित परिणाम झाला आहे.

त्यामुळे पथविक्रेत्यांच्या व्यवसायास खेळत्या भांडवलांचा पतपुरवठा तातडीने करण्याच्या उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान स्वनिधी पथविक्रेत्यांसाठी विशेष सुक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने महापालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जात आहे.

## निविदा तातडीने रद्द करा, अन्यथा आंदोलन : आ.महेश बालदी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडकोने पुष्पक नोड येथील सेक्टर २८ (भाग–१) मधील जमिनीचा विकास करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केलेली आहे आणि त्या अनुषंगाने शेलघर येथील कातकरीवाडी विस्थापित होणार असल्याचे स्वरूप लक्षात येत आहे. त्यामुळे सदरची निविदा तातडीने रद्द करावी, अन्यथा आंदोलन उभारण्याचा इशारा उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी सिडकोला दिला आहे.

या संदर्भात आमदार महेश बालदी यांनी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील शेलघर गावाच्या मागे असलेल्या आदिवासी बांधवांच्या घरांभोवतालच्या (कातकरीवाडी) जागेचा विकास करण्यासाठी सिडकोने निविदा काढल्याचे समजते. सदर निविदेमध्ये शेलघर येथील कातकरीवाडी सुध्दा विस्थापित होणार असल्याचे या स्वरूपावरून लक्षात येते. कातकरीवाडीतील घरे ही पारंपारीक रहिवासी असून गेल्या अनेक पिढ्यांपासून तेथे रहात आहेत. आणि तसे पुरावे या आदिवासी बांधवांकडे उपलब्ध आहेत.

विकासाच्या नावाखाली सदर लोकांना विश्वासात न घेता अथवा त्यांचे प्रतिनिधी व लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता त्या आदिवासी कुटुंबांना विस्थापित करण्यासाठी सिडको थेट निविदा काढते हे धक्कादायक आहे. त्यामुळे यासंदर्भात सिडकोने तातडीने पूर्नविचार करावा आणि सदर काम रद्द करावे. तसेच या आदिवासी बांधवाना विस्थापित न होऊ देता स्थानिक प्रतिनिधींशी चर्चा करून मगच या गावांच्या परिसराच्या विकासाचे धोरण निश्चित करावे, असे या निवेदनात नमूद केले असून यासंदर्भामध्ये सदर निविदा



रद्द न झाल्यास आंदोलनात्मक पवित्रा उचलावा लागेल, असा इशाराही या निवेदनातून अधोरेखित केला आहे.

## श्री लक्ष्मीनारायण मंदिर तळ्याची दान पेटीची हलवाहलव



**दै.रायगड नगरी । तळा**

श्री लक्ष्मीनारायण मंदिर तळा दानपेटीची पाच सहा माकडांनी मंदिराची कौलै काढून आत प्रवेश करून मंदिराची पेटीची उलथापालथ करून गाभाऱ्यातुन हॉलमध्ये ओढत आणून सभागृहात आणली.

पोलिसांना पाचारण करण्यात आले. तपासात प्रार्थमिक अंदाज भुरट्या चोरांचा असावा असा व्यक्त केला गेला. मात्र दुसरे दिवशी सि.सि.कॅमेरा फुटेजमध्ये या माकड चोरट्यांनी खायला मिळेल या आशेने मंदिरात प्रवेश करून पुजा साहित्याची नासधूस केली. तळा शहरासह तालुक्यात वानर सेनेची मोठी फौज असून अन्न धान्य, कपडे, भाजी पाला भातशेती, यांची मोठ्या प्रमाणात नासधूस करीत असून शेतकऱ्यांसह नागरिक हैराण झाले असून वनविभागाचे वृत्तपत्राचे माध्यमातून लक्ष वेधले असताना देखील यावर कोणतीच उपाय योजना करीत नसल्याने उदासिनता दिसून येत आहे. या माकडाच्या हैदोसामुळे शेती, फुलबागा, फळबागा, भाजीपाला करण्याकडे पाठ फिरवली आहे. माकडाच्या हैदोसाला शेतकरी वैतागले आहेत तरी वन विभागाने पैदास रोखण्यासाठी उपाय योजना आखावी किंवा यांचा कायमचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.

## पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची बैठक पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मंथन हॉल या ठिकाणी घेण्यात आली.

सदर बैठकीमध्ये सर्व पोलीस पाटील यांना गावातील प्रत्येक राजकीय, जातीय, धार्मिक कार्यक्रम व चालू घडामोडी बाबत माहिती कळवणे, गावात तटस्थ भूमिका ठेवणे, अवैद्य धंदेबद्दल तात्काळ माहिती देणे, गावाच्या माहितीबाबत रजिस्टर बनवणे, गोडाऊनमध्ये असलेले संशयास्पद माल, अचानक वास्तव्यास आलेल्या संशयित व्यक्तीवर व परकीय नागरिकांवर लक्ष ठेवणे, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आचारसंहितेचे भंग होणार नाही याबाबत लक्ष देणे आदी सूचना देण्यात आल्या. सदर बैठकीला ४० पोलीस पाटील उपस्थित होते.



## पाणीपट्टी दुप्पट कर वाढ मागे घेण्यास माणगांवकरांचे नगरपंचायत मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव उतेखोल येथील श्रीजी गृहनिर्माण हाउसिंग सोसायटीत एकूण ५१ सदनिकाधारक असुन त्यांचे सोसायटीला नगरपंचायतीचे एक इंची लाइनची चार कनेक्शन दिली आहेत. याची एकत्र मिळुन दरवर्षी रुपये २४०००/– इतकी पाणीपट्टी नियमितपणे येत असते. असे असताना माणगांव नगरपंचायत कार्यालयाकडून सन २०२२–२३ या वर्षाकरिता पाणीपट्टी दुप्पट करून रुपये ४८०००/– इतकी आकारण्यात आली अशी माहीती देताना या सोसायटीचे अध्यक्ष यांनी आमचे जवळ संपर्क साधुन आपली नाराजी व्यक्त केली आहे. अचानक दुप्पट वाढलेली पाणीपट्टीची रक्कम सोसायटी सदस्यांना भरणे अवघड आहे. सोसायटीच्या झालेल्या मासिक सभेमध्ये या पाणीपट्टी दरवाढीविषयी येथिल सदनिकाधारकांची चर्चा झाली व दुप्पट पाणीपट्टी देण्यास सर्व सदनिकाधारकांकडून विरोध करण्यात येत आहे.

अशा प्रकारचे लेखी निवेदन माणगांव नगर पंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी यांना श्रीजी गृहनिर्माण सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी दिले असुन ही पाणीपट्टी दरवाढ कृपाकरुन मागे घेण्यात यावी अशी विनंती देखिल करण्यात आली आहे. अशाच प्रकारचे आणखी एक लेखी निवेदन वंदन को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी मर्यादितच्या पदाधिकाऱ्यांनी देखील माणगांव नगरपंचायतचे मुख्याधिकारी यांना दिले आहे. अशा प्रकारे या पाणीपट्टी दुप्पट वाढीला नागरिकांचा विरोध होत आहे. समस्त माणगांव मधुन लोक याबाबत आता

.../२

# मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल विठ्ठलवाडी-राजखलाटी या विद्यालयात मुंबई येथील निर्मल निव चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साही वातावरणात संपन्न करण्यात आले. या शिबिरात नाक, कान, घसा, डोळे, दात तसेच विविध प्रकारचे आजारांवर डॉ.नितिन वैद्य, डॉ.किरण सिंह, डॉ.किसन तुसाळकर, डॉ.प्रणव तिवारी, डॉ. परेश म्हात्रे, पवन दुग्गल, शहा पुष्कला, हेमांगी मॅडम आदी तज्ञांकडून मोफत तपासणी करून सदृढ आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मा.सोनावणे साहेब

अॅड.शेखर खोपकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१६१६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२३

१) श्री.राजेश लधाराम चुघ
वय : ५३ वर्षे, धंदा : व्यापार
२) श्री.मोनिश राजेश चुघ
वय : २५ वर्षे, धंदा : शिक्षण
३) श्रीमती.निशिता राजेश चुघ
वय : २३ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.रुम नं.३५०, आर.सी.बॅरेक नं.३०, चेंबुर कॉलनी,
गांधी मार्केट जवळ, मुंबई ४०००७४ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ यांची आई मयत किरण राजेश चुघ या दि.०८/०५/२०१६ रोजी मयत झाल्या आहेत. मृत्यूसमयी मयत किरण राजेश चुघ यांच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

जय गणेश रेसिडेन्सी, फ्लॅट नं.५०२, पाचवा मजला,
प्लॉट नं.८ ए, सेक्टर नं.८ (पी.टी.),
क्षेत्र ४६.५१ चौ.मी. (बिल्टअप), उलवे, ता.पनवेल, जि.रायगड

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत किरण राजेश चुघ यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल, हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.२९/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

मा.श्री.मुजावर साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११४०/२०२२
नि.नं.१८/ड
ने.ता.०२/०१/२०२३

१) श्रीमती.शारदा बालाराम म्हात्रे
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
श्री.दिनेश बालाराम म्हात्रे
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
१ व २ रा.मु.पो.वशेणी, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ ही अर्जदार नं.२ यांची आई आहे. अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२ यांचे वडील कै.बालाराम लक्ष्मण म्हात्रे हे दि.१६/०८/२०२० रोजी मयत झाले आहेत. सदर मयत बालाराम लक्ष्मण म्हात्रे यांच्या मालकीची मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे अॅवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : चाणजे, ता.उरण, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| १ | ३/८० | २७ | ० | १४-२-२ |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत बालाराम लक्ष्मण म्हात्रे यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारे भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत बालाराम लक्ष्मण म्हात्रे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२९ माहे नोव्हेंबर सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# गळफास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात कारणावरून एका इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शहरातील तक्का परिसरात घडली आहे. शहरा-तील तक्का परिसरात राहणारे रवींद्रनाथ पाटील (वय ५९) यांनी आपल्या राहत्या घरात अज्ञात कारणावरून सिलिंगला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

मा.श्री.सोनवलकर साहेब

अर्जदारातर्फे अॅड.मंगेश एम. भोंडकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो.यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.१३३८/२०२२
ने.ता.१७/०१/२०२३

कु.मंदाकिनी नारायण मोकल
विवाहानंतरचे नाव सौ.मंदाकिनी किशोर पाटील
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.११, चाळ नं.२२/क, घरकूल सोसायटी,
कामगार हॉस्पिटल रोड नं.३३, शंकर मंदिरजवळ,
संत ज्ञानेश्वर नगर, वागळे इस्टेट, ठाणे ४००६०४ — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामपंचायत अधिकारी / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत साई
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचा जन्म दि.२४/१२/१९६२ रोजी मु.पो.साई, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे आणि अर्जदार यांचे जन्माची नोंद होणेकरिता पनवेल येथील मा.न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर अर्जदार कु.मंदाकिनी नारायण मोकल विवाहानंतरचे नाव सौ.मंदाकिनी किशोर पाटील यांचा जन्म वर नमूद केलेल्या ठिकाणी झालेला आहे किंवा कसे याबद्दल कोणास काही कळविण्याचे असेल व सदरहू अर्जास कोणाचीही हरकत असेल तर या जाहीर नोटीशीच्या तारखेपासून ३० दिवसांचे मुदतीत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार यांचेकडून योग्य तो पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीच्या जन्माची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

आज दि.२३ माहे नोव्हेंबर २०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

मा.सोनावणे साहेब

अॅड.योगिता पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५८०/२०२२
नि.नं.१०/ड
ने.ता.१९/१२/२०२२

१) श्री.नुतन मदन पिसाळ
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) नयना विठ्ठल ढमाले
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : काही नाही
यांच्या मार्फत व्यवस्थापक (Exeucutor)
श्री.मदन पांडुरंग पिसाळ
वय : ५४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.रुम नं.१४०१, सी विंग, निलकंठ पाम्स,
घोडबंदर रोड, ठाणे — अर्जदार

ज्यापेक्षा मयत कै.रजनी विठ्ठल ढमाले यांच मृत्यू दि.१६/१२/२०१९ रोजी पोलारिस हॉस्पिटल, से-२०, खारघर येथे झाला आहे. अर्जदार या मयत कै.रजनी विठ्ठल ढमाले यांच्या मुली आहेत. तसेच व्यवस्थापक हे कै.रजनी विठ्ठल ढमाले यांचे जावई आहेत. अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

सदनिका मिळकतीचे वर्णन (१/३) हिस्सा

A) फ्लॅट नं.०:२, सी ५/७,
से.३, सीबीडी बेलापूर,
नवी मुंबई ४००६१४
अॅग्रीमेंट व्हॅल्यू-५०,६००/-
(रक्कम रुपये पन्नास हजार सहाशे)
एकूण क्षेत्रफळ : ३८.२८ चौ.मी.

B) प्लॉट नं.ए-५१, ढमाले निवास,
से-१२, खारघर, नवी मुंबई,
ता.पनवेल, जि.रायगड
अॅग्रीमेंट व्हॅल्यू-३,१०,७३५/-
(रक्कम रुपये तीन लाख दहा हजार सातशे पस्तीस)
एकूण क्षेत्रफळ : १०३.२० चौ.मी.

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजावयाचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी हरकत दाखल न केल्यास सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत कै.रजनी विठ्ठल ढमाले यांचा वारस घोषित करेल. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मा.कोर्ट अर्जदार यास प्रोबेट प्रमाणपत्र प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२९/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# विक्रमवीर अभिनेते प्रशांत दामले यांचा पनवेल महापालिकेच्यावतीने सन्मान

## कोरोना संसर्गाच्या निर्बंधानंतर फडके नाट्यगृहात पहिल्यांदाच हाऊस फुल्लची पाटी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रंगभूमीवरती साडे बारा हजार नाटकांचे प्रयोग करून अनोखा विक्रम करणारे अभिनेते प्रशांत दामले यांना शनिवारी पनवेल महापालिकेच्यावतीने आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या सुविद्य पत्नी सौ.नेहा गणेश देशमुख यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व उपायुक्त गणेश शेटे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला तसेच त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी, सौ. प्रिती डाके, सौ.पूनम शेट तसेच नाट्यगृह विभागाचे व्यवस्थापक राजेश डोंगरे, पालिका कर्मचारी उपस्थित होते.

करोना संसर्गाच्या निर्बंधानंतर पनवेल महापालिकेचे आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पहिल्यांदाच हाऊस फुल्लची पाटी झळकली. प्रशांत दामले फॅन फाऊंडेशनचे 'सारखं काहीतरी होतंय' या नाट्यगप्रयोयाची सर्व तिकीटे विकली गेल्यामुळे नाट्यगृहाच्या बाहेर 'हाऊसफुल्ल'ची पाटी झळकली. ६६५ आसनक्षमता असलेल्या महापालिकेच्या आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातला 'हाऊसफुल्ल' होणारा हा पहिलाच प्रयोग ठरला. आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी याबाबत समाधान व्यक्त केले. नाट्यगृहाचे कर्मचाऱ्यांमध्येही यावेळी उत्साह पहाण्यास मिळाला.





**सर्व पनवेलकर नाट्य रसिकांचे, महानगरपालिकेचे अविस्मरणीय स्वागताबद्दल आणि सत्काराबद्दल मी आभार मानतो.**

**तुमच्या पुढील पिढीलाही नाटकाची गोडी निर्माण होईल यासाठी प्रयत्न करा. माझी बॅकस्टेज टीम, कौटुंबिक सपोर्ट आणि तुम्हा सर्व नाट्य रसिकांमुळेच मी ही उंची गाठू शकलो.**

**- प्रशांत दामले, अभिनेते**

मा.श्री.इंदलकर साहेब

अॅड.शुभांगी पाटील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्युडी.मॅजि.सो, पनवेल यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.९०२/२०१९
ने.ता.०४/०१/२०२३

श्री.बळीराम गणु कातकी
वय : ६१ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.भेरले, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

भिंगार ग्रुप ग्रामपंचायत,
भिंगार, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांचे आजोबा कै.अर्जुन सख्या कातकरी हे दि.०१/०९/१९६० रोजी मौजे : भेरले, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने सदर मृत्यूची नोंद संबंधित कार्यालयामध्ये करण्याचे राहून गेले आहे. सबब कारणे सदरचे अर्जदार यांचे आजोबा दि.०९/०९/१९६० यांच्या मृत्यू नोंदणी करण्याचे आदेश भिंगार ग्रुप ग्रामपंचायत व पनवेल पंचायत समिती / तहसील पनवेल यांना देण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब सदर फौजदारी चौकशी अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूची नोंद करून मिळण्याकरिता अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर मृत्यूच्या नोंदीच्या अर्जाचा आदेश मिळण्याकरिता कोणाच्याही, कसल्याही व कोणत्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या लाभांत मृत्यूच्या नोंदीचा आदेश दिला जाईल.

आज दि.२९/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

मा.गोडसे साहेब

वारसाचे सर्टीफिकेटबद्दल जाहीर नोटीस

अॅड.मानस मोहंती व
अॅड.योगिनी भराडे-मोहंती
अर्जदार यांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.१७१९/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/०१/२०२३

१) श्रीमती.काशिबाई शिवाजी चव्हाण
वय : ५९ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्रीमती.समुद्धी सुधाकर चव्हाण
वय : २९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सिल्वर स्टार, प्लॉट नं.५०, ६३, ६४, ६५,
सेक्टर नं.१८, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
महाराष्ट्र-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

निरंक — सामनेवाला

वरील अर्जदार क्रं.१ यांचा मुलगा व अर्जदार क्र.२ यांचे पती कै.सुधाकर शिवाजी चव्हाण यांचे निधन दि.०३/०५/२०२१ रोजी ए/२०१, सिल्वर स्टार, प्लॉट नंबर ५०, सेक्टर नं.१८, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र-४१०२०६ येथे निधन झाले. मयत कै.सुधाकर शिवाजी चव्हाण यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

१/३ रा हिस्सा फ्लॅट क्र.ए/२०१, दुसरा मजला, सिल्वर स्टार, प्लॉट नंबर ५०, ६३, ६४, ६५, सेक्टर नंबर १८, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६, ता.पनवेल, जि.रायगड. महाराष्ट्र-४१०२०९, क्षेत्रफळ ५०.०८७ चौ.मी. कारपेट एरिया आणि ६०.६२० चौ.मी. टेरेस एरिया

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दि.२९ माहे नोव्हेंबर २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**


**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# लोकल गाडीतून पडुन तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खान्देश्वर ते मानसरोवर दरम्यान लोकल गाडीतून पडुन एका अज्ञात तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सदर तरुणाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत.

खान्देश्वर ते मानसरोवर दरम्यान लोकल गाडीतून एका अज्ञात तरुणाचा स्टेशन कि.मी. नं. ४४/१०,४४/११ चे जवळ कोणत्यातरी अज्ञात लोकल गाडीतून पडुन जखमी होऊन मृत्यू झाला आहे. सदर तरुणाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत असून तरुणाविषयी काही माहिती असल्यास पन-वेल रेल्वे पोलीस ठाणे दूरध्वनी क्र.०२२-२७४६७१२२ किंवा सहा.पोलीस निरीक्षक बी.व्ही.दोडमिसे मो.९४९४९१२२९४ यांच्याशी संपर्क साधावा.




अॅड.प्रिती जगदीश भारती

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६६२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०१/२०२३

श्री.बबन धनाजी साळुंखे
रा.माया विहार को.ऑप.हौ.सो.लि.,
सदनिका क्र.११०, १ ला माळा,
बोरी नाका, सिव्हील डिफेन्स,
उरण, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात कै.चंद्रकांत धनाजी साळुंखे यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कै. चंद्रकांत धनाजी साळुंखे यांचा मृत्यू दि.१९/०१/२०२२ रोजी माया विहार को.ऑप.हौ.सो.लि., सदनिका क्र.११०, १ ला माळा, बोरी नाका, उरण, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी येथे झालेला आहे. कै.चंद्रकांत धनाजी साळुंखे हे हयातीत असताना विठाबाई धनाजी साळुंखे व चंद्रकांत धनाजी साळुंखे यांनी दि.२०/०३/१९९८ रोजी रजिस्टर करारनाम्याने खालील मिळकत :-

सदनिका क्र.११०, १ ला माळा, माया विहार को.ऑप.हौ.सो.लि., बोरी नाका, उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ येथे क्षेत्रफळ ४३३ चौ.फुट सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा पनवेल अनु क्र.६९१/१९९८ कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दि.२०/०३/१९९८ रोजी नोंदविलेला आहे. सदर मिळकतीवर वारस म्हणून नोंद घेण्याकरिता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसाहक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या हरकती या योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून अर्जदारास वारस दाखल देण्यात येईल. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.१८ माहे ११/२०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# माणगांवकरांचे नगरपंचायत मुख्याधिकारी यांना लेखी निवेदन

निवेदन देण्यास सरसावले आहेत. ही दरवाढ सध्याच्या महागाईचा विचार करता टप्प्या टप्याने वाढवावी अशी मागणी होत आहे. एकदम शंभर टक्के कर वाढ नगरपंचायत प्रशासनाकडुन अपेक्षित नाही.

मागील काही वर्षात टप्प्या टप्याने ती अपेक्षित होती पण अशी अचानक नागरिकांचे आर्थिक बजेट कोलमडुन टाकणाऱ्या वाढी बाबत नगरपंचायतीने पूनर्विचार करुन ती टप्प्या टप्यात अपेक्षित आहे. सध्याची बिकट परिस्थिती पाहता, वाढती महागाई जिवनावश्यक वस्तु अन्नधान्य, घरगुती गॅस सिलेंडर, विजबिल यांच्या भरमसाठ वाढलेल्या किंमतीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. अशातच अशा प्रकारे पिण्याचे पाण्यासाठी दामदुप्पट किंमत मोजावी लागणार! यामुळे नागरिकांमधुन संताप व्यक्त होत आहे. माणगांवकरांचे नशिब चांगले म्हणुन बारमाही वाहणाऱ्या काळनदीचा मुबलक पाणी साठा उपलब्ध आहे. पूर्वी नळाचे पाणी पूर्ण दाबाने मिळत होते, आता मात्र त्यामानाने कमी दाबाने पाणी मिळते. वाढती लोकसंख्या, वसाहती व वाढत्या लाईन जोडणीमुळे पाणी पुरवठा यंत्रणेवर ताण आहे. याबाबतचे वास्तव कोणीही नाकारत नाही. परंतु काही भागात कमी दाबाने नळाला येणारे पाणी यामुळे नागरिक हैराण आहेत. अशातच अनेक नळ लाईनवर मोटरपंप बसविल्याचे वास्तव लोक बोलतात, त्यामुळे लाईनच्या शेवटच्या भागातील लोकांना पाणी पुरवठा कमी दाबाने होत असल्याची लोकांची बोंबाबोंब अधुन मधुन ऐकावयास मिळत आहे. खरतर पाण्याचे सुख असलेल्या माणगांवात अशा प्रकारे अचानक पाणीपट्टीत वाढ अपेक्षित नव्हती. ती टप्प्या टप्याने वाढविली असती तर माणगांवकरांवर पाणीपट्टीचा हा मोठा भार पडला नसता. परंतु शासनाचा असा जिआर असल्याचे बोलले जात, ही पाणीपट्टी एकदम दूप्पट कशी काय वाढली ? याची माणगांवकरांमध्ये उलट सुलट चर्चा होत असून नाराजी पहावयास मिळत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

जिवेत शरदः शतम

श्री.सदानंद वेदपाठक

यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!



# आयुर्वेदिक उपचार आरोग्याला ऊर्जा देणारे असतात : डॉ. ज्योती सातपुते

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'आयुर्वेद ही भारतीय संस्कृती आहे. तिची साथ आपण सोडत आहोत. पूर्वी पासून आयुर्वेदाने उपचार करून दुर्धर आजार कायमचे बरे होत असत. आपल्याला आता सारे चुटकीसरशी व्हावे असे वाटत असते त्यामुळे आपण लवकर बरे होण्यासाठी ॲलोपथी उपचार घेऊन औषध - गोळ्या घेतो मात्र त्यामुळे शरीरावर त्याचा परिणाम होतो. त्याउलट आयुर्वेदिक उपचार पद्धतीने व आपल्याकडे उपलब्ध असलेल्या वनौषधीने आपल्या शरीरावर कोणताही अपाय होत नाही उलट ऊर्जा मिळते.' असे महत्वपूर्ण प्रतिपादन ज्योविस आयुर्वेद दादरच्या डॉ. ज्योती सातपुते यांनी येथे केले.



श्री महालक्ष्मी देवस्थान वेण-गाव यांच्यावतीने माजी आमदार स्वर्गीय तुकाराम सुर्वे प्रतिष्ठान, ज्योविस आयुर्वेद दादर आणि नरी सामाजिक संस्था दादर यांच्या सहकार्याने मंदिराच्या सभागृहात मोफत आयुर्वेद चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. राज सातपुते यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून शिबिराचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष रंजन दातार, प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुकेश सुर्वे, सचिव मनीषा सुर्वे, खजिनदार विजय मांडे, सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, दीपक बेहेरे, विशाल जोशी, रमेश मुंढे, विलास वैद्य, सचिन वझे आदी उपस्थित होते.

विशाल जोशी यांनी प्रास्ताविकात, 'कर्जत तालुक्यातील आदिवासी भागात शिबिर आयोजित केल्यास त्याची जबाबदारी महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट घेणार असून त्या परिसरातील ३५ आदिवासी वाड्यांतील आदिवासी बांधवांना त्याचा लाभ घेता येईल.' असे सूचित केले. कोठारी यांनी मी आत्तापर्यंत अनेक आरोग्य शिबीरे आयोजित केली. काही मोठ्या आरोग्य शिबिरांना भेटी दिल्या मात्र या आयुर्वेदिक शिबिरा सारखे शिबिर मी कधीच अनुभवले नाही.' असे स्पष्ट केले. या शिबिरात शिबिरात चामखीळ आणि भोवरी काढणे, खांदे दुखी, गुढगे दुखी, कंबर दुखी, वात, पित्त, अग्निकर्म, रक्त मोक्षण, दूषित रक्त काढणे आदी आयुर्वेदिक उपचार करण्यात आले. एकूण २९१ रुग्णांची आरोग्य तपासणी करून त्यांना सर्व प्रकारची औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. शिबिरांत कर्जत तालुक्याच्या ग्रामीण व शहरी भागाबरोबरच डोंबिवली, कल्याण, बदलापूर आदी भागातील रुग्ण देखील तपासणी करून घेण्यासाठी आले होते.

तपासणी साठी डॉ. राज सातपुते आणि डॉ. ज्योती सातपुते यांच्या बरोबर डॉ. अस्मिता सावंत, डॉ. सोनाली घाणेकर, डॉ. प्राची चावडे, डॉ. सिद्धी लवंगारे, डॉ. हर्षदा राऊत, डॉ. पूजा पाटील, डॉ . विशाखा जाधव आदी डॉक्टरांसह आयेशा वाडकर, तनिश सोलंकी, राज भिंगारदेवे, प्रियांका वाडेकर आदी आरोग्य सेवकांनी रुग्णांची तपासणी केली. याप्रसंगी लक्ष्मण तथा बंधू पवार, यशवंत गोरे, हृषीकेश दातार, विशाल गोगटे, तुषार जोशी, रंजना प्रभू - खानोलकर, ममता सिंग, ज्योती पाटील, लीना गावडे, सानिका सावंत, विलास लाड, कुमार बोराडे, नितीन दगडे, साक्षी वाडेकर, पद्मजा देशमुख, सुजाता, सावंत, सुप्रिया देशमुख आदी उपस्थित होते.

# रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा; पॉकेट, पैसे, चेक केले परत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिक्षामध्ये विसरलेला पॉकेट रिक्षाचालकाने परत देऊन प्रामाणिकपणा दाखवला आहे. पनवेल तालुक्यातील नांदगाव येथील जगदीश भोईर या रिक्षा चालकाने रिक्षात सापडलेले पर्किट प्रवासाला परत दिले आहे. या पॅकिटमध्ये पाच हजार रुपये, ३० हजार रुपयांचा चेक व शासकीय कागदपत्र होते. भास्कर मुक्कादम शेख हा प्रवासी खारघर येथून भोईर याच्या रिक्षात बसला होता. खांदा कॉलनी मध्ये तो उतरला. रिक्षावाला मार्केट यार्डपर्यंत आला. यावेळी त्याच्या रिक्षामध्ये दुसरे प्रवासी बसले होते. त्याने रिक्षात पहिले असता त्याला आपल्या रिक्षात पॉकेट आढळून आला. त्याने पोलीस पाटील यांना संपर्क केला मग पोलीस पाटलांनी पोलिसांकडून माहिती काढली. त्यानंतर पॅकिट उघडले असता त्या पॅकिटमध्ये नंबर सापडला. मग त्यांनी त्याच्याशी संपर्क साधून पॉकेट, पैसे, चेक परत केला. रिक्षाचालकाने दाखवलेल्या प्रामाणिकतेबद्दल त्याचे कौतुक केले जात आहे.

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे बेमुदत उपोषण तात्पुरते स्थगित; सकारात्मक चर्चा

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे आज खांदा कॉलनी येथील कामगार उपायुक्त कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरु करण्यात आले होते. परंतु वरिष्ठ पातळीवर सकारत्मक चर्चा झाल्याने तूर्तास सदर बेमुदत उपोषण तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ ( संलग्न - भारतीय मजदुर संघ ) महावितरण वाशी मंडळ तर्फे विविध मागण्या संदर्भात पनवेल खांदा कॉलनी येथील कामगार उपायुक्त कार्यालयासमोर आज बेमुदत आमरण उपोषण सुरु करण्यात आले होते.मात्र दुपारी कामगार उपआयुक्त विघ्नहर्ता कॉम्प्लेक्स, खांदा कॉलनी, पनवेल रायगड या कार्यालयात सहाय्यक कामगार आयुक्त शीतल कुलकर्णी,महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे पदाधिकारी, महावितरणचे कंत्राटी कामगार, ठेकेदारांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली.यात विविध विषयावर चर्चा झाली.या बैठकीला सहाय्यक कामगार आयुक्त शीतल कुलकर्णी, वाशी विभागाचे मॅनेजर जयश्री मराडे, पनवेल एमएसईबी डेप्युटी मॅनेजर सचिन घोडेकर, मे. ऑल ग्लोबल सर्विस प्रा. ली. या एजेन्सीचे प्रतिनिधी प्रशांत देठे, रोहित परब, नरेश मखीजा, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे महामंत्री सचिन मेंगाळे, कार्याध्यक्ष उमेश अणेराव,रायगड जिल्हा सचिव कमाल खान, पनवेल सिटी कोषाध्यक्ष कल्पेश म्हात्रे, कामगार बाळकृष्ण ठाकूर, खांदेश्वर गोपनीय विभागाचे पोलीस अधिकारी सलीम तळवी आदी उपस्थित होते.कामगारांच्या विविध समस्या संदर्भात सहाय्यक कामगार आयुक्त शीतल कुलकर्णी यांनी ठेकेदारांना व ठेकेदार प्रतिनिधीना विविध सूचना केल्या.

कामगारांच्या समस्या त्वरित सोडविण्याचे सूचना शीतल कुलकर्णी यांनी ठेकेदारांना केल्या .सचिन मेंगाळे, उमेश अनेराव यांनी कामगारांच्या विविध समस्यावर उत्तमपणे, भक्कमपणे बाजू मांडली. यावेळी प्रत्येक समस्यावर उपाययोजना शीतल कुलकर्णी यांनी सुचविले व त्या उपाययोजनांची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश ठेकेदार व ठेकेदारांचे प्रतिनिधिंना केले.यावेळी ठेकेदारांनी सर्व सूचनांचे पालन केले जाईल असे आश्वासन दिले. तसे त्यांनी बैठकीमध्ये झालेल्या विषयावर, उपाययोजनावर सही सुद्धा केली आहे. कामगारांना यापुढे कोणताही त्रास होणार नाही अशी हमी ठेकेदारांनी दिली.विविध विषयावर सकारात्मक चर्चा झाल्याने सदर बेमुदत उपोषण तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले.वाशी मंडळ अंतर्गत ५१२ कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. त्यापैकी सदर उपोषण स्थळी १५० कंत्राटी कामगार उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने मे. ऑल ग्लोबल सर्व्हिस प्रा. ली. या एजन्सीचे लायसन्स रद्द करून सदर कंत्राटदारास काळ्या यादीत टाकावे,दोषी अधिकाऱ्यांवर त्वरित कार्यवाही करावी, न्यायालयीन संरक्षित कामगारांना पुन्हा त्वरित कामावर घेण्यात यावे. अशोक अखाडे ठेकेदारचे सुरक्षा ठेव मधुन महावितरण ने कामगारांचे राहिलेले थकीत वेतन व बोनस देणे,जय दत्त एजंसीचे सुरक्षा ठेव मधुन महावितरण ने कामगारांचे राहिलेले पगार व फरक देणे,अपघात झालेल्या कामगारांचे व त्यांचे परिवारांचे त्वरित मेडिकल भरपाई व पेन्शन लागु करणे, सर्व कंत्राटी कामगारांचे एकाच दिवशी पगार झाले पाहिजे, परिपत्रक ५३६ एम एम आरडीए झोन चे पालन करून समान काम समान वेतन व बोनस परिपत्रक ची अंमलबजावणी करणे, संघटनेच्या प्रमुख मागण्या होत्या .

---

मा.मुजावर सो।

ॲड.अस्मिता एन. भुवड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६८६/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.०६/०१/२०२३

१) श्रीमती.भाविका भास्कर बताले
वय : ३३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.वारदोली, पनवेल, रायगड
२) कुमारी दृष्टी भास्कर बताले
वय : १२ वर्षे, धंदा : विद्यार्थी
राहणार : वरीलप्रमाणे
३) कुमार ओंकार भास्कर बताले
वय : १० वर्षे, धंदा : विद्यार्थी
राहणार : वरीलप्रमाणे — अर्जदार

विरुद्ध

१) श्रीमती.चंद्रभागा दामु बताले
वय : ७५ वर्षे, व्यवसाय :
राहणार : वरीलप्रमाणे — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, कै.भास्कर दामु बताले हे दि.१२/०४/२०२१ रोजी वारदोली पनवेल येथे मृत्यू झाला. कै.भास्कर दामू बताले ह्यांचे मृत्यूनंतर त्यांची आई, पत्नी व मुले हेच कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार क्र.१ भाविका भास्कर बताले मयत भास्कर दामू बताले ह्यांच्या पत्नी आहेत. अर्जदार क्र.२ कुमारी दृष्टी भास्कर बताले ही मयत भास्कर दामू बताले ह्यांची मुलगी आहे व अर्जदार क्र.३ कुमार ओंकार भास्कर बतालेही मयत भास्कर दामू बताले ह्यांचा मुलगा आहे. सामनेवाला क्र.१ चंद्रभागा दामू बताले ह्या भास्कर दामू बताले ह्यांच्या आई आहेत. सा.वाला क्र.१ ने सही करण्यास नकार दिल्यामुळे त्यांना सा.वाला केले आहे.

कै.भास्कर दामू बताले ह्यांना अर्जदार क्र.१ ते ३ व सामनेवाला क्र.१ ह्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार यांनी सदरील दिवाणी चौकशी अर्ज कै.भास्कर दामू बताले ह्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर बाबत कोणालाही हरकत असेल अथवा त्या संदर्भात जर कोणतीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात व्यक्तीश अथवा वकीलांसोबत हजर होवून हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न घेतल्यास अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल.

ही नोटीस आज रोजी दि.२१/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

ॲड.प्रिती जगदीश भारती

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१५१६/२०२२

नि.नं.८/ड

श्री.बबन धनाजी साळुंखे
रा.माया विहार को.ऑप.हौ.सो.लि.,
सदनिका क्र.११०, १ ला माळा,
बोरी नाका, सिव्हील डिफेन्स,
उरण, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात कै.विठाबाई धनाजी साळुंखे यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. कै. विठाबाई धनाजी साळुंखे यांचा मृत्यू दि.०६/०८/२००६ रोजी माया विहार को.ऑप.हौ.सो.लि., सदनिका क्र.११०, १ ला माळा, बोरी नाका, उरण, ता.उरण, जि.रायगड येथे राहत्या घरी येथे झालेला आहे. कै.विठाबाई धनाजी साळुंखे हे हयातीत असताना विठाबाई धनाजी साळुंखे व चंद्रकांत धनाजी साळुंखे यांनी दि.२०/०३/१९९८ रोजी रजिस्टर करारनाम्याने खालील मिळकत :-

सदनिका क्र.११०, १ ला माळा, माया विहार को.ऑप.हौ.सो.लि., बोरी नाका, उरण, ता.उरण, जि.रायगड ४००७०२ येथे क्षेत्रफळ ४३३ चौ.फुट सदनिका विकत घेतलेली आहे. सदरचा करारनामा पनवेल अनु क्र.६९१/१९९८ कडे मा.दुय्यम निबंधक पनवेल यांच्या कार्यालयात दि.२०/०३/१९९८ रोजी नोंदविलेला आहे. सदर मिळकतीवर वारस म्हणून नोंद घेण्याकरिता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारसाहक्काबाबत कोणाची हरकत, अधिकार अथवा वारसा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आपल्या हरकती या योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून योग्य त्या मुदतीत कोणाच्या हरकती न आल्यास, कोणाचीही हरकत नाही असे समजून अर्जदारास वारस दाखल देण्यात येईल. मागाहून आलेल्या हरकतींचा कोणताही विचार केला जाणार नाही.

आज दि.१० माहे ११/२०२२ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.मुजावर सो।

ॲड.अस्मिता एन. भुवड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६७०/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.०६/०१/२०२३

१) श्रीमती.सायली संतोष भोसले
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मुक्काम भिंगार, पोस्ट ओएनजीसी,
पनवेल, जि.रायगड
२) पुर्वा संतोष भोसले
वय : १० वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.वरील प्रमाणे
३) श्रीमती.शारदा शिवाजी भोसले
वय : ७० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.वरील प्रमाणे — अर्जदार क्र.१ ते ३

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, कै.संतोष शिवाजी भोसले हे दि.१०/०६/२०२१ रोजी एमजीएम हॉस्पिटल कामोठे पनवेल येथे कोविड साथीमुळे मृत्यू झाला. कै.संतोष शिवाजी भोसले ह्यांचे मृत्यूनंतर त्यांची आई, पत्नी व मुले हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार क्र.१ सायली संतोष भोसले, मयत कै.संतोष शिवाजी भोसले ह्यांच्या पत्नी आहेत. अर्जदार क्र.२ पुर्वा संतोष भोसले ही मयत संतोष शिवाजी भोसले ह्यांची मुलगी आहे. व अर्जदार क्र.३ शारदा शिवाजी भोसले ह्या मयत कै.संतोष शिवाजी भोसले ह्यांची आई कै. संतोष शिवाजी भोसले ह्यांना अर्जदार क्र.१ ते ३ ह्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार यांनी सदरील दिवाणी चौकशी अर्ज कै.संतोष शिवाजी भोसले ह्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर बाबत कोणालाही हरकत असेल अथवा त्या संदर्भात जर कोणतीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात व्यक्तीश अथवा वकीलांसोबत हजर होवून हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न घेतल्यास अर्जदार यांच्या लाभात वारस दाखला प्रदान करण्यात येईल.

ही नोटीस आज रोजी दि.२१/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गुन्नाल सो.कोर्ट

ॲड.अस्मिता एन. भुवड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७०५/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२३/०१/२०२३

१) सुनेत्रा रमेश घाडीगांवकर
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मारुती सदन, रुम नं.२०१, प्लॉट नंबर ४३,
सेक्टर १०, खांदा कॉलनी, पनवेल
२) कुमारी इंद्रायणी रमेश घाडीगांवकर
वय : १७ वर्षे, व्यवसाय : विद्यार्थी
राहणार : वरीलप्रमाणे
३) कुमारी इरा रमेश घाडीगांवकर
वय : १२ वर्षे, व्यवसाय : विद्यार्थी
राहणार : वरीलप्रमाणे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

उपरोल्लखित अर्जदार नामदार कोर्टास कळविते की,

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.रमेश लवु घाडीगांवकर हे दि.२४/०४/२०२१ रोजी जंबो कोविड सेंटर कळंबोली येथे मृत्यू झाला. कै.रमेश लवु घाडीगावकर ह्यांचे मृत्यूनंतर त्यांची पत्नी व मुले हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार क्र.१ सुनेत्रा रमेश घाडीगावकर ह्या मयत कै.रमेश लवु घाडीगावकर ह्यांच्या पत्नी आहेत. अर्जदार क्र.२ इंद्रायणी रमेश घाडीगांवकर ही कै.रमेश लवु घाडीगावकर ह्यांची मुलगी आहे. अर्जदार क्र.३ इरा रमेश घाडीगावकर ही कै.रमेश लवु घाडीगावकर ह्यांची मुलगी आहे. कै.रमेश लवु घाडीगावकर ह्यांची आई सुमित्रा लवु घाडीगावकर ह्या मयत आहेत.

कै.रमेश लवु घाडीगावकर ह्यांना अर्जदार क्र.१ ते ३ ह्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार यांनी सदरील दिवाणी चौकशी अर्ज कै.रमेश लवु घाडीगावकर ह्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर बाबत कोणालाही हरकत असेल अथवा त्या संदर्भात जर कोणतीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात व्यक्तीश अथवा वकीलांसोबत हजर होवून हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न घेतल्यास अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल.

ही नोटीस आज रोजी दि.२८/११/२०२२ रोजी माझ्या सही व शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.गुन्नाल सो.कोर्ट

ॲड.अस्मिता एन. भुवड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६६९/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०६/०१/२०२३

१) श्रीमती.कुंदा विनोद डावलेकर
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.ओएनजीसी, भिंगारी,
घर नंबर ४०९, पनवेल, जिल्हा : रायगड
२) कुमार निखील विनोद डावलेकर
वय : १८ वर्षे, व्यवसाय : विद्यार्थी
रा.वरील प्रमाणे
३) कुमार जिग्नेश विनोद डावलेकर
वय : १४ वर्षे, व्यवसाय : विद्यार्थी
रा.वरीलप्रमाणे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, कै.विनोद वसंत डावलेकर हे दि.०६/०८/२०२१ रोजी एमजीएम हॉस्पिटल, कामोठे, पनवेल, जिल्हा : रायगड येथे मृत्यू झाला. कै. विनोद वसंत डावलेकर ह्यांचे मृत्यूनंतर त्यांची पत्नी व मुले हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.विनोद वसंत डावलेकर ह्यांची आई वच्छला वसंत डावलेकर ह्यांचा मृत्यू दि.२८/०८/१९९१ गाव : भिंगारी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झाला.

अर्जदार क्र.१ कुंदा विनोद डावलेकर ह्या मयत विनोद वसंत डावलेकर ह्यांच्या पत्नी आहेत. अर्जदार क्र.२ निखील विनोद डावलेकर व अर्जदार क्र.३ जिग्नेश विनोद डावलेकर हे मयत विनोद वसंत डावलेकर ह्यांची अज्ञान मुले आहेत. मयत विनोद वसंत डावलेकर ह्यांची आई वच्छला वसंत डावलेकर ह्या मयत आहेत. मयत विनोद वसंत डावलेकर ह्यांना अर्जदार ह्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार यांनी सदरील दिवाणी चौकशी अर्ज मयत विनोद वसंत डावलेकर ह्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर बाबत कोणालाही हरकत असेल अथवा त्या संदर्भात जर कोणतीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात व्यक्तीश अथवा वकीलांसोबत हजर होवून हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत योग्य हरकती न घेतल्यास अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल.

ही नोटीस आज रोजी दि.२८/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.गुन्नाल साहेब

ॲड.राजकुमार व्ही. जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१७५३/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.१७/०१/२०२३

कै.विनायक विष्णू करंदीकर मयताचे वारस
कै.श्रीराम विनायक करंदीकर (मयत मुलगा)
१) श्रीमती.संध्या श्रीराम करंदीकर
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.मंदार श्रीराम करंदीकर
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
३) सौ.किर्ती श्रीराम करंदीकर
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.१ ते ३ रा.बी-००३, पहिला मजला,
आदित्य प्रज्ञा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग,
गोखले हॉल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ श्रीमती.संध्या श्रीराम करंदीकर यांचे सासरे आणि अर्जदार क्र.२ श्री.मंदार श्रीराम करंदीकर व अर्जदार क्र.३ सौ.किर्ती श्रीराम करंदीकर यांचे आजोबा कै.विनायक विष्णू करंदीकर ह्यांचे निधन दि.१५/०४/१९९२ रोजी व त्यांची पत्नी कै.सरस्वती विनायक करंदीकर यांचे निधन दि.२८/०७/१९९२ रोजी मौजे : डोंबिवली, ता.कल्याण, जि.ठाणे येथे राहत्या घरी झाले असून कै.विनायक विष्णू करंदीकर यांची आई कै.लक्ष्मी विष्णू करंदीकर यापूर्वीच मयत असून कै.विनायक विष्णू करंदीकर यांचा मुलगा म्हणजेच अर्जदार क्र.१ श्रीमती.संध्या श्रीराम करंदीकर यांचे पती आणि अर्जदार क्र.२ श्री.मंदार श्रीराम करंदीकर व अर्जदार क्र.३ सौ.किर्ती श्रीराम करंदीकर यांचे वडील कै.श्रीराम विनायक करंदीकर यांचे निधन दि.११/०३/२०२० रोजी मौजे : डोंबिवली, ता.कल्याण, जि.ठाणे येथे राहत्या घरी निधन झालेले आहे. त्या संदर्भाचे मृत्यूचे दाखले अर्जदारांनी ह्या अर्जासोबत दाखल केलेले असून सदर अर्जदार हेच कै.विनायक विष्णू करंदीकर यांचे वारस आहेत म्हणून त्यांनी खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नांव | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वावंजे | २४/२ | ०.०१.५० | --- |
| गागोदे खुर्द | ४७० | ०.०४.०० पो.ख. ०.०१.०० | ०.०६ |

वरील अर्जदार हेच कै.विनायक विष्णू करंदीकर यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.विनायक विष्णू करंदीकर यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.२९/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## पर्यटन संचालनालया मार्फत एक दिवशीय नि:शुल्क सहलीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

संविधान दिनाचे औचित्य साधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित घटना, इतिहास आणि त्यांच्या कार्याची माहिती सामान्य जनतेला मिळण्याच्या उद्देशाने पर्यटन संचालनालयामार्फत टूर सर्किटद्वारे दि.३ व ४ तसेच ७ व ८ डिसेंबर, २०२२ या कालावधीत कोकणातल्या महाड येथील चवदार तळे आणि गांधारपाले बौध्द लेणी या पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी नि:शुल्क एकदिवशीय सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती पर्यटन संचालनालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी दिली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित विविध पैलूंची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याच्या उद्देशाने त्यांच्या जीवनाशी निगडीत स्थळे व बुध्दिस्ट स्थळांचा समावेश असलेल्या पर्यटन 'टूर सर्किटचे' मा.मुख्यमंत्री व मा.पर्यटनमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतेच उद्घाटन झाले. या टूर सर्किटमध्ये विभागनिहाय मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर या जिल्हयांमधील पर्यटनस्थळांचा समावेश करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने कोकण विभागातून टूर सर्किटकरीता महाड येथील चवदार तळे आणि गांधारपाले बौध्द लेणी या ऐतिहासिक स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. ही एकदिवशीय सहल असून यासाठी पर्यटकांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. या सहलीमध्ये पर्यटकांसाठी बससेवा, गाईड, अल्पोपहार, दुपारचे जेवण व पिण्याचे पाणी या सर्व सुविधा नि:शुल्क पुरविण्यात येणार आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम सेवा प्राधान्य या शर्तीवर सहलीचे आरक्षण स्विकारण्यात येणार असून दि.३ व ४ डिसेंबर,२०२२ च्या सहलीचे आगाऊ आरक्षण दि.१ डिसेंबर,२०२२ पर्यंत व दि.७ व ८ डिसेंबर,२०२२ च्या सहलीचे आगाऊ आरक्षण दि.५ डिसेंबर,२०२२ पर्यंत करणे अनिवार्य आहे. आगाऊ आरक्षणासाठी तसेच सहली संदर्भात अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्र.९९३०३५९३८४/९४२१०५१७०८ या क्रमांकांवर तसेच ddtourisum.kokan-mhgov.in या ई-मेल पत्त्यावर संपर्क साधावा. या सहलींसाठीच्या बसेस सीबीडी, बेलापूर/कोकण भवन, नवी मुंबई या बसस्थानकांवरून नियोजित वेळेवर वर नमूद तारखांना सोडण्यात येतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन संघर्ष आणि त्यांनी केलेल्या कार्याची माहिती मिळविण्यासाठी ही एक सुवर्ण संधी आहे. या संधीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यटन संचालनालय कोकण विभाग, नवी मुंबईचे उपसंचालक (पर्यटन) श्री हनुमंत कृ. हेडे यांनी केले आहे.

## कळंबोली पोस्ट ऑफिसमध्ये चोरीचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली पोलिस ठाणे हद्दीतील सेक्टर ३ मधील पोस्ट ऑफिसमध्ये खिडकीची ग्रिल काढून चोरी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण काहीही न चोरता चोरट्यांना काढता द्राय घ्यावा लागला. पोस्ट ऑफिसमधील कर्मचारी नेहमीप्रमाणे कामावर आल्यानंतर त्यांना खिडकीची ग्रिल गायब झाल्याचे पाहून धक्का बसला, चोरट्यांनी खिडकीची ग्रिल काढून चोरी करण्याचा प्रयत्न केला. या ऑफिसमध्ये पाच संगणक (कॉम्प्युटर) व तिजोरीत रक्कम होती. पण चोरट्यांना चाहूल लागताच त्यांनी पळ काढला, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# माथेरानच्या विकासाला विरोध करणाऱ्या अशिक्षित विचारांचा कडेलोट झाल्याशिवाय पर्यटन क्रांती अशक्य !

**दै.रायगड नगरी । माथेरान**

ज्या गावात सुंदर रस्ते बनले जातात त्या गावाचा आपसूकच हमखास विकास होतोच होतो त्या गावाची प्रगती होऊन सर्वांनाच उत्तम प्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात हे जरी त्रिवार सत्य असले तरीसुध्दा यास जगातील कदाचित माथेरान हेच एकमेव स्थळ असावे की अशा विकास कामांपासून काही अशिक्षित, वैचारिक बालिश बुद्धीच्या विचारांमुळेच अपवाद राहिलेले आहे. शंभर लोकांचे ज्याठिकाणी भले होणार असेल त्यावेळी मूठभर लोकांचा विचार न करता गावाच्या प्रगतीमध्ये कशाप्रकारे भरती येऊ शकते यासाठी अभ्यासू लोकांनी ज्यांना भावी पिढीला आधुनिक युगाप्रमाणे सर्वतोपरी यशाचं शिखर गाठण्यासाठी त्यांच्या पंखात बळ निर्माण करण्यासाठी भक्कमपणे आधार देण्याची आवश्यकता बनली आहे.आजवर ज्यांनी केवळ वर्तमानाचा विचार करून इथल्या गधामजुरीच्या रोजंदारीत एक पिढी संपविली आहे. त्या अशिक्षित विचारांच्या लोकांना उज्ज्वल भविष्यात काय काय सुंदर प्रगती खुणावत आहे याबाबत काडीचेही ज्ञान नसल्यामुळे अशीच बालिश विचारांची मंडळी



प्रामुख्याने विकासाला चालना देण्याऐवजी काही राजकीय पक्षांच्या नेत्यांच्या इशाऱ्यावर आर्थिक प्रलोभनांना बळी पडून विकासाला विरोध करण्यात धन्यता मानतात.

एकीकडे विकासाला विरोध नाही म्हणणारी बालिश मंडळी नेहमीप्रमाणे राजकीय पक्षांच्या अधिपत्याखाली वावरत असून नको त्या ठिकाणी प्रत्येक कामांत नाहक खोडा आणून आपल्याला विरोधातूंन काही साध्य करता येते का याकडे लक्ष केंद्रित करीत आहेत. शासनाने विकासात्मक पाऊल उचलले तरीसुद्धा होणाऱ्या कामांमध्ये चुका काढण्यात इथली स्वयंघोषित स्वतःला इंजिनियर समजणारी बालिश मंडळी अग्रेसर दिसतात. कोरोना काळात अत्यंत हलाखीची परिस्थिती निर्माण झाली होती त्यावेळी गावातील विकास कामांना लागणाऱ्या साहित्याची वाहतूक गावातील हीच मंडळी करत होती ज्यांचा सद्यस्थितीत विकास कामांना विरोध आहे. परंतु २०१६ मध्ये अस्तित्वात असणाऱ्या सभागृहातील लोकप्रतिनिधीच्या ठरावा नुसार सर्वच कामे सुरू आहेत. त्यामुळे होणाऱ्या कामांना विरोध करताना संबंधित लोकप्रतिनिधींना याचा जाब विचारण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नसल्याने नाहक अधिकारी वर्गाला धारेवर धरून एकप्रकारे वेठीस आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.राजकीय पक्षांच्या नेतेमंडळीना काहीही करून सत्तेत विराजमान व्हायचे आहे त्यामुळे काही महत्वाकांक्षी मंडळी अगदी पातळी सोडून विकासाच्या विरोधात केवळ मतांसाठी राजकारण करतांना दिसतात. अशांना गावाच्या हितावह नवनवीन संकल्पना पर्यटकांना अभिप्रेत साधनांचा वापर करावा याबाबत स्वारस्य नसल्याने हे एक सुंदर पर्यटनस्थळ जरी आजमितीपर्यंत विकासापासून लांब असले तरी आगामी काळात होणाऱ्या नवनवीन बदलामुळे निश्चितपणे जगाच्या नकाशावर ठळक अक्षरात चमकेल असाही विश्वास आणि आशावाद गावाबद्दल सकारात्मक विचार करणाऱ्या भूमिपुत्रांना आहे.त्यासाठी माथेरानच्या विकासाला विरोध करणाऱ्या अशिक्षित विचारांचा कडेलोट झाल्याशिवाय पर्यटन क्रांती अशक्य असेही बोलले जात आहे.

आजवरच्या इथल्या राजकीय घडामोडींचा आलेख पाहिला असता राजकीय क्षेत्रातील काही महत्वाकांक्षी मंडळींना केवळ स्वतःची पोळी भाजण्यासाठी विकास कामांना तिलांजली देऊन मतांचे राजकारण करून सत्ता कशाप्रकारे स्थापन करता येईल आणि त्याच सत्तेतूनच पद,पैसा आणि मोफतची प्रतिष्ठा प्राप्त करून आपला आणि कुटुंबातील सदस्यांना,नातेवाईकांना आर्थिक दृष्टीने सक्षम करता येईल याकडे कटाक्ष दिसत आहे. मग त्या निवडणुका सहकार क्षेत्रातील असोत वा नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका असोत.त्यामुळेच माथेरान सारखे हे रमणीय सुंदर पर्यटनस्थळ आजही नतद्रष्ट्या,घाणेरड्या प्रवृत्तीच्या राजकीय मंडळींमुळेच विकासापासून वंचित राहिलेले आहे.अशा संतप्त प्रतिक्रिया जेष्ठ स्थानिकांमधून वारंवार उमटताना दिसत आहेत.

## मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपजीविका विषयक उपक्रमाकरिता इच्छुकांनी संपर्क साधावा : संजय पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कांदळवन कक्ष, रायगड-अलिबाग यांच्याकडून युनायटेड नेशन डेव्हलपमेंट प्रोग्राम ग्रीन क्लायमेट फंड सहाय्यित Enhancing Climate Resilience in Coastal areas of खपवळर हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत उपजीविकाविषयक सी विड फार्मिंग, मासे मूल्यवर्धित उत्पादने, मत्स्य खाद्य उत्पादन घटक आणि मासे वाळवणी / धुरळणी केंद्र हे उपक्रम (प्रकल्प) राबविण्यात येणार आहेत.

या प्रकल्पाचे कार्यक्षेत्र रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन व अलिबाग हे तालुके असणार आहेत. तरी या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी इच्छुक गट लाभार्थी यांनी सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, रायगड-अलिबाग कार्यालयाशी किंवा कांदळवन कक्ष, अलिबाग कार्यालयाशी संपर्क साधावा. वरील उपक्रमांसाठी गट लाभार्थ्यांस प्रकल्प किमतीच्या ९०% अनुदान व १०% लाभार्थीला गुंतवणूक करावी लागेल.

वरील उपजीविका विषयक उपक्रम माहितीसाठी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, रायगड-अलिबाग अथवा कांदळवन कक्ष, रायगड-अलिबाग कार्यालयाशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी संपर्क अधिकारी श्री. म. वि. नांदोस्कर, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, अलिबाग, भ्रमणध्वनी क्रमांक ८००७५२३५०५, श्री. दशरथ शिरसाट, जिल्हा समन्वय अधिकारी, रायगड (UNDP-GCF Project) भ्रमणध्वनी क्रमांक ७५०७४३७९३१

कार्यालयाचा पत्ता:- मत्स्यव्यवसाय विभाग तिसरा मजला, सिद्धी अपार्टमेंट, डॉ. पुष्पलता शिंदे हॉस्पिटलच्या समोर, अलिबाग पेण रोड, अलिबाग. पिन कोड ४०२२०१. ई-मेल आयडी acfalibaggmail.com, कांदळवन कक्ष, अलिबाग कार्यालयाचा पत्ता- वन परीक्षेत्र अधिकारी, अलिबाग, अलिबाग रेवस रोड, खडतल पुलाजवळ, बामणोली, अलिबाग, येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय (तां) रायगड - अलिबाग,श्री. संजय पाटील यांनी केले आहे.

## उरण ते शिर्डी पालखी दिंडी पद यात्रेला प्रारंभ

**दै.रायगड नगरी । उरण**

श्री साई सेवा मंडळ उरण विभाग यांच्या वतीने श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री दत्तजयंती उत्सवानिमित्त श्री साई बाबांचा भव्य पायी पालखी वारकारी दिंडी पदयात्रा श्री दत्त मंदिर उरण येथून काल सकाळी ६ वाजता श्रींची आरतीने प्रारंभ करून श्री क्षेत्र शिर्डी येथे प्रस्थान झाली आहे. पालखी दिंडी ६ डिसेंबर २००२२ रोजी सकाळी १० वाजतां श्री क्षेत्र शिर्डी येथे पोहोचणार आहे. सकाळी दत्त मंदिर उरण येथून निघतांना पायी पालखी दिंडीचे उरण शहरातून फाटक्याच्या आतिष बाजीने जोरदार स्वागत करण्यात आले.



पायी पालखी दिंडी दास्तानफाटा येथे येताच पायी पालखी दिंडीचे ओम साई मित्र मंडळ चिर्ले यांच्या वतीने श्री नीलकंठ घरत यांनी स्वागत केले. दुपारी पायी पालखी दिंडी मध्यान्ह आरती करितां साई मंदिर वहाळ येथे येताच पालखी दिंडीचे साई देवस्थानच्या वतीने अध्यक्ष रविंद्र पाटील, सौ.पार्वती पाटील, जगन पाटील यांनी उस्फुर्त स्वागत केले.

यावेळी साई देवस्थान च्या वतीने महा प्रसाद देण्यांत आला. यावेळी पद यांत्री साठी सौ.सुप्रिया घरत तसेच दिगंबर कोळी यांचा भजनरुपी कार्यक्रम पार पडला.तसेच यावेळी देवस्थान च्या वतीने श्री साई सेवा मंडळ दिंडीचे पदाधिकारी यांना सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी श्री साई सेवा मंडळ दिंडीच्या वतीने साई मंदिर वाहळचे अध्यक्ष रविंद्र पाटील यांचे सत्कारानंतर दुपारी पायी पालखी दिंडीचे शिर्डीच्या दिशेने प्रस्थान झाले.

## रायगड जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी रणधुमाळी सुरु

### जिल्ह्यांतील ७ आमदारांची होणार सत्व परिक्षा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

मिनी विधानसभा समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणूकांचे पडघम वाजण्यास सुरुवात झाली आहे. राज्यातील ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या रायगड जिल्ह्यातील सर्वच्या सर्व १५ तालुक्या तील तब्बल २४० ग्रामपंचायतींचा समावेश आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यातील ६, उरण १८, कर्जत ७, खालापूर १४, तळा १, पनवेल १०, पेण २६,पोलादपूर १६, महाड ७३, माणगाव १९, मुरुड ५, म्हसळा १३, रोहा ५, श्रीवर्धन १३, सुधागड १४ आशा २४० ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

यामध्ये जिल्ह्यांतील ७ आमदारांची कसोटी लागणार आहे यामध्ये सर्वात जास्त ९४ ग्रामपंचायतीची जबाबदारी बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या(शिंदे गट) चे पक्ष प्रतोद महाडचे आमदार भरतशेट गोगावले यांचेवर तर सर्वात कमी १० ग्रामपंचायती पनवेलचे भाजप आमदार प्रशांतदादा ठाकूर यांचेवर आहे. अन्य पुढील प्रमाणे आलिबागचे आमदार शिवसेनेचे बाळासाहेब ठाकरे (शिंदे गट) आमदार महेंद्र दळवी याच्या मतदार संघात ११ ग्रामपंचायती, बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे (शिंदे गट) कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या मतदार संघात २१ ग्रामपंचायती,पेण मतदार संघातील भाजपचे आमदार रवींद्र पाटील यांच्या मतदार संघात ४० ग्रामपंचायती, श्रीवर्धन मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार आदीती तटकरे यांच्या मतदार संघात ४६ ग्रामपंचायती, भाजपला पाठींबा देणारे उरणचे अपक्ष आमदार महेश बालदी यांच्या मतदार संघात १८ ग्रामपंचायतींचा मतदारसंघ निहाय समावेश आहे. अद्यापही जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणूका लांबणीवर पडल्या आहेत. नजिकच्या काळात त्या निवडणूकांचा कार्यक्रम रुध्दा निश्चित होणार आहे. ग्रामपंचाय तीच्या निवडणूका कार्यक्रम सुरू झाल्याने ही जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकांची रंगीत तालीम ठरणार असल्याने या निवडणूकांना विशेष महत्व प्राप्त झाले असल्याचे जाणकार सांगत आहेत.

या ग्रामपंचायतींची निवडणूक १८ डिसेंबरला तर मतमोजणी २० डिसेंबरला होणार आहे.अर्ज दाखल करण्याची मुदत २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर आहे. जिल्ह्यांत शेकापक्ष, आणि काँग्रेस किती ग्रामपंचायतीत चुरस निर्माण करते. सरपंचपदाच्या थेट निवडणुकींमुळे जिल्ह्यांत राजकीय रणधुमाळी वाढणार आहे.

## उभ्या ट्रकमधून डिझेलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उभ्या ट्रकमधून अज्ञात चोरटयांनी डिझेलची चोरी केल्याची घटना पनवेल जवळील चिंचवण गावाच्या हद्दीत घडली आहे.

राहुल आंधळे या ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक चिंचवण गावाजवळ मुंबई लेनवर द पेंटाकोस्टल मिशन चर्चच्या समोर उभा ठेवला असता कोणत्यातरी अज्ञात इसमाने सदर ट्रकच्या इंधन टाकीचे झाकण उघडून आतील १४० लिटर डिझेल ज्याची किंमत जवळपास १३ हजार रूपये इतकी आहे. या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.




## माथेरानच्या प्रशासक सुरेखा भणगे यांच्या पुढाकाराने महिलांसाठी हिरकणी कक्षाची सुविधा



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांना ऐन गर्दीच्या वेळी प्रवासातून आल्यावर येथील मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावर अनेकदा बाहेर पडताना ताटकळत उभे राहावे लागते. विशेषतः महिला पर्यटकांना आपल्या लहान लहान बाळांना घेऊन या गर्दीच्या ठिकाणी स्तनपान सुध्दा करणे अवघड होते. त्यामुळे दस्तुरी येथील नगरपरिषदेच्या प्रवासी कर वसुली जागेतील एका प्रशस्त खोलीत नगरपरिषदेच्या उत्तम प्रशासक सुरेखा भणगे ( शिंदे) यांच्या पुढाकाराने हिरकणी कक्ष उभारण्यात आला असून यापुढे स्थनदा मातांना आपल्या बाळांना स्तनपान करणे शक्य होणार आहे.

जेष्ठांना सुध्दा याठिकाणी दुसऱ्या बाजूच्या जागेत विश्रांती साठी खोली असणार आहे त्याचप्रमाणे येणाऱ्या पर्यटकांची नेहमीच याठिकाणी दिशाभूल करून त्यांच्याकडून वाहतुकीसाठी अवाच्या सव्वा रक्कम घेतली जाते याकामी पर्यटकांना योग्यप्रकारे मार्गदर्शन व्हावे इथले विविध मुख्य पॉइंट्स त्याचप्रमाणे वाहतुकीच्या सुविधे बाबतीत माहिती मिळावी यासाठी माहिती केंद्र उभारण्यात आले आहे.

त्यामुळे साहजिकच पर्यटकांना याचा लाभ घेता येणार आहे. नगरपरिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या प्रयत्नांमुळे हे शक्य झाले आहे आजवर कुणीही राजकीय व्यक्तींना अशा साध्या आणि सोप्या कामांचा उलगडा झाला नव्हता परंतु अल्पावधीतच सुरेखा भणगे यांनी आपल्या परीने पर्यटकांना, नागरिकांना अभिप्रेत कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. त्यामुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.